आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१७ जुलै २०२५ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- स्वच्छता ही भारतीयांच्या स्वभाव आणि संस्कारांचा भाग असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन

- देशातल्या दहा लाख नागरिकांना कृत्रिम बुद्धीमत्तेचं प्रशिक्षण विनाशुल्क देण्याची अश्विनी वैष्णव यांची घोषणा

- नियम न पाळणाऱ्या महाराष्ट्रातल्या ३३४ खासगी रुग्णालयांवर बंदी घातल्याची आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांची विधानसभेत माहिती

- नाशिक इथं झालेल्या अपघातात ७ जणांचा मृत्यू, २ जण गंभीर जखमी

**आणि**

- इराकमध्ये अल कुट शहरात मॉलला लागलेल्या आगीत ५० जणांचा मृत्यू

**<><><><>**

स्वच्छता ही भारतीयांच्या स्वभाव आणि संस्कारांचा भाग असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत ९व्या स्वच्छ सर्वेक्षण पुरस्कारांचं वितरण करण्यात आलं, त्यावेळी त्या बोलत होत्या. स्वच्छ भारत अभियानांतर्गत राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या प्रयत्नांचं कौतुक करताना राष्ट्रपती मुर्मू म्हणाल्या की स्वच्छ सर्वेक्षण हा एक यशस्वी उपक्रम ठरला आहे.

- **होल्ड बाईट- राष्ट्रपती -**

स्वच्छ भारत मिशन - शहरी अंतर्गत स्वच्छतेसाठी राबवण्यात येणाऱ्या उपक्रमाअंतर्गत यावर्षी सुपर स्वच्छ लीग शहरं आणि लोकसंख्येच्या आधारे पाच श्रेणींमध्ये पुरस्कार प्रदान करण्यात आले.

यामध्ये, इंदूरने सलग आठव्या वर्षी भारतातील सर्वात स्वच्छ शहर म्हणून आपला किताब कायम ठेवला. केंद्र सरकारच्या वार्षिक स्वच्छता सर्वेक्षणात सुरत दुसऱ्या क्रमांकावर आहे, तर नवी मुंबई तिसऱ्या क्रमांकावर आहे. तसंच लोकसंख्येच्या आधारे विभागण्यात आलेल्या ५ श्रेणींमध्ये महाराष्ट्रातल्या मीरा- भाईंदर, कराड शहरांना सुपर स्वच्छ शहर

पुरस्कार मिळाला आहे. या कार्यक्रमादरम्यान, विविध श्रेणींमध्ये एकूण ७८ पुरस्कार प्रदान करण्यात आले.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या बिहार आणि पश्चिम बंगालला भेट देणार आहेत. बिहारच्या भेटीत ते रेल्वे, रस्ते, ग्रामीण विकास, मत्स्योत्पादन, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान यांच्याशी संबधित काही विकास कामांचा आरंभ तर काही विकास कामांचं उद्घाटन करतील.

प्रधानमंत्री उद्या पश्चिम बंगाललाही भेट देणार आहेत. या भेटीत ते पाच हजार कोटींहून अधिक खर्चांच्या विकास कामांचं उद्घाटन करतील तर काही विकास कामांचा आरंभ करतील. तेल आणि नैसर्गिक वायू, उर्जा, रेल्वे आणि रस्ते यासंबधीच्या प्रकल्पांचा यामध्ये समावेश आहे.

<><><><>

वीज ग्राहकांना एकशे पंचवीस युनिट पर्यंत मोफत वीज, सौर उर्जा उत्पादनासाठी सहाय्य असे उर्जेसंबधित निर्णय बिहार सरकारने आज घोषित केले. पुढील महिन्यापासून घरगुती वीज ग्राहकांना एकशे पंचवीस युनिटपर्यंत मोफत वीज देण्याच्या निर्णयाचा फायदा एक कोटी सदुसष्ठ लाख ग्राहकांना होईल, असं बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी या निर्णयाची घोषणा करताना सांगितलं. याशिवाय बिहार सरकार ग्राहकांच्या संमतीनं त्यांच्या घरांवर सौरउर्जासंच बसवून देईल. त्यासाठी ग्राहकांना सरकारकडून आर्थिक सहाय्य मिळेल तर निम्न आर्थिक गटातील ग्राहकांच्या घरावरच्या सोलर संचाचा खर्च सरकार करेल असंही नितीशकुमार यांनी म्हटलं आहे. पुढील तीन वर्षात बिहारमध्ये सौरउर्जेद्वारे दहा हजार मेगावॅटपर्यंत वीजनिर्मिती करायचं सरकारचं उद्दिष्ट आहे असंही त्यांनी म्हटलं आहे.

<><><><>

देशातील दहा लाख नागरिकांना एआय अर्थात कृत्रिम बुद्धीमत्तेचं प्रशिक्षण विनाशुल्क देण्याची घोषणा केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केली. ते नवी दिल्ली इथं ‘सामान्य सेवा दिवस - डिजिटल भारताची दहा वर्षे’ या कार्यक्रमात बोलत होते. या प्रशिक्षणासाठी ग्रामीण स्तरावरच्या उद्योजकांना प्राधान्य देण्यात येईल असंही त्यांनी यावेळी स्पष्ट केलं.

युपीआय पेमेंटची संख्या व्हिसाच्या पेमेंटहून जास्त झाल्याचं सांगत डिजिटल भारत ही संकल्पना आणि त्याचे लाभ घराघरापर्यंत पोचवण्यासाठी सामान्य सेवा क्रेंद्रातील कर्मचाऱ्यांनी घेतलेल्या कष्टांचा त्यांनी गौरव केला. आयआरसीटीसी सेवा नागरिकांपर्यत पोचवण्यासाठी पुढे येण्याचं आवाहन वैष्णव यांनी यावेळी ग्रामीण उद्योजकांना केलं.

<><><><>

दिल्ली सरकारने भ्रष्टाचार विरोधी दलाला आधीच्या आप सरकारच्या काळात झालेल्या भ्रष्टाचाराच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. जय भिम मुख्यमंत्री कौशल्य विकास योजनेतल्या भ्रष्टाचारासंबंधी हे आदेश दिल्याची माहिती दिल्लीचे शिक्षण मंत्री आशिष सूद यांनी वार्ताहर परिषदेत दिली. वंचित घटकांच्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेसाठी मोफत प्रशिक्षण देणाऱ्या या योजनेत अनेक पात्र उमेदवारांना नाकारण्यात आले होते असंही त्यांनी म्हटलं आहे.

<><><><>

दरपत्रक न लावणाऱ्या तसंच इतर नियम न पाळणाऱ्या ३३४ खासगी रुग्णालयांवर बंदी घातली आहे, अशी माहिती सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज विधानसभेत दिली. एकूण २३ हजार ३५४ रुग्णालयांची तपासणी करण्यात आली, यातल्या ४ हजार ८०७ रुग्णालयांना नोटीस बजावल्याचं आबिटकर यांनी सांगितलं. आरोग्य विभागाकडून दरवर्षी रुग्णालयांची तपासणी केली जाईल. तसंच बॉम्बे नर्सिंग ॲक्ट मध्ये सुधारणा करण्यासाठी पुढच्या अधिवेशनात विधेयक आणलं जाईल असं आबिटकर म्हणाले. प्रशांत बंब, मनोज जामसुतकर यांनी याविषयी प्रश्न विचारला होता.

डॉक्टर आणि इतर कर्मचाऱ्यांना प्राथमिक आरोग्य केंद्रात उपस्थित राहणं बंधनकारक आहे. त्यांना तिथे राहता यावं यासाठी निवासाची व्यवस्था करण्यात येणार आहे असंही मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज विधानसभेत सांगितलं. ज्या प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टर उपस्थित नसतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल असं आबिटकर म्हणाले. अभिजित पाटील यांनी याविषयी प्रश्न विचारला होता.

आशा स्वयंसेविका आणि गटप्रवर्तकाचं गेल्या पाच ते सहा महिन्यांचं मानधन प्रलंबित असल्याबाबत काँग्रेस आमदार नाना पटोले यांनी प्रश्न उपस्थित केला. तसंच आशा

स्वयंसेविका आणि गटप्रवर्तकांची मानधन वाढ केली जाणार आहे का असा प्रश्न विचारला. यावर मानधन यापुढे प्रलंबित राहणार नाही असं आश्वासन प्रकाश आबिटकर यांनी दिलं.

<><><>

नाशिक जिल्ह्यात एक कार आणि मोटारसायकलमध्ये धडक होऊन झालेल्या अपघातात ३ महिला आणि एक बालकासह ७ जणांचा मृत्यू झाला. तर २ जण गंभीर जखमी झाले आहेत. नाशिक- दिंडोरी रस्त्यावर काल रात्री अल्टो कार दुचाकीला धडकली आणि दोन्ही वाहनं रस्त्यालगत असलेल्या एका लहान नाल्यात उलटली, अशी माहिती पोलिसांनी दिली. जखमींना तातडीनं उपचारासाठी नाशिक जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

<><><>

भारतीय महिला क्रिकेट संघानं इंग्लंडविरुद्ध पन्नास षटकांचा पहिला सामना काल साऊदॅम्प्टन इथं ४ गडी राखून जिंकला आणि तीन सामन्यांच्या या मालिकेत आघाडी घेतली. प्रथम फलंदाजी करताना इंग्लंडनं निर्धारित ५० षटकात ६ बाद २५८ धावा केल्या. भारताच्या क्रांती गौड आणि स्नेह राणानं प्रत्येक दोन गडी बाद केले. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वातल्या भारतीय संघानं दहा चेंडू शिल्लक असताना विजयाचं लक्ष्य गाठलं. दीप्ती शर्मानं नाबाद ६२ धावा करून या विजयाला आकार दिल्याबद्दल तिला सामनावीर घोषित करण्यात आलं. दुसरा सामना शनिवारी लंडनमध्ये लॉर्ड्स मैदानावर होणार आहे.

<><><>

फ्रीस्टाईल ग्रँड स्लॅम बुद्धिबळ स्पर्धेत भारताचा ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंद यांने प्रथम मानांकित मॅग्नस कार्लसनविरुद्ध सामना जिंकून उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. लास वेगास इथं सुरु असलेल्या या स्पर्धेत प्रज्ञानंदने खेळाच्या चौथ्या फेरीत केवळ एकोणचाळीस चालींमध्ये कार्लसनवर मात केली.

<><><>

जपान खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत आज सकाळी टोकियो इथं झालेल्या पुरुष दुहेरीच्या उपउपांत्य फेरीत भारताच्या चिराग शेट्टी आणि सात्विक साईराज रांकीरेड्डीला चीनच्या वांग चांग आणि लियांग वेकेंग यांच्या जोडीकडून ०-२ असा पराभव पत्करावा लागला. तर

पुरुष एकेरीच्या उपउपांत्य फेरीत भारताच्या लक्ष्य सेन आणि जपानच्या कोडाई नारावाका यांच्यात सामना सुरु आहे. महिला एकेरीत, भारताची अनुपमा उपाध्यायची लढत चीनच्या वांग झियीसोबत होईल.

**<><><><>**

इराकमध्ये अल कुट शहरातल्या एका मॉलला लागलेल्या आगीत ५० जणांचा मृत्यू झाला आहे आणि अनेक जण जखमी झाले आहेत. अग्निशमन दलाने बचाव कार्य सुरू केलं आहे. मॉलच्या तसंच इमारतीच्या मालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या दुर्घटनेविषयी अधिक तपास सुरू आहे.

**<><><><>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सर्व १५० देश आणि विभागांना समान आयातशुल्क आकारण्याचे संकेत दिले आहेत. वॉशिंग्टन डीसी इथं वार्ताहरांशी बोलताना त्यांनी म्हटलं आहे की, जे या योजनेत आहेत ती मोठी राष्ट्रं नसून त्यांच्याबरोबर अमेरिकेचा फार व्यापार नाही. जपानबरोबर मात्र वाटाघाटी सुुरु असून त्यातून फार काही निष्पन्न होईल असं वाटत नाही.  यंदाच्या एप्रिल महिन्यात ट्रम्प यांनी ज्या राष्ट्रांबरोबर द्विपक्षीय वाटाघाटी झालेल्या नाहीत त्या राष्ट्रांना एकसमान दहा टक्के आयातशुल्क आकारण्याचा निर्णय घेतला होता.

**//<><><><>//**